डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर
राज्यशास्त्र विभाग

उच्च शिक्षण संधी विषयक मार्गदर्शन सत्र अहवाल
दिनांक- 7 ऑगस्ट -2026

कार्यक्रमाचे नाव- उच्च शिक्षण संधी विषयक मार्गदर्शन
उपस्थित विद्यार्थी- 30
आयोजक- डॉ. विद्या चौरपगार

सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटरतर्फे सीयूईटी प्रवेश परीक्षा व उच्च शिक्षण संधी विषयक मार्गदर्शन सत्र संपन्न

डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथे राज्यशास्त्र विभागातर्फे सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटर यांच्या वतीने पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी सीयूईटी प्रवेश परीक्षा व उच्च शिक्षणातील करिअर संधी या विषयावर मार्गदर्शन व ओरिएंटेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात विद्यार्थ्यांना सीयूईटी प्रवेश परीक्षेचे महत्त्व, तिची तयारी करण्याची पद्धत तसेच सावित्रीबाई फुले रिसोर्स सेंटर, दक्षिण नागपूर येथे सुरू होणाऱ्या मोफत सीयूईटी कोचिंग बॅचेसची माहिती देण्यात आली. यावेळी बाबासाहेब आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन च्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकास, करिअर नियोजन, रोजगाराच्या संधी आणि सर्वांगीण विकास याविषयी मार्गदर्शन केले.

सत्रामध्ये विद्यार्थ्यांना दिल्ली विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, अशोका विद्यापीठ, अझीम प्रेमजी विद्यापीठ यांसारख्या देशातील नामांकित उच्च शिक्षण संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया आणि उपलब्ध शैक्षणिक संधींची सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला सूरज निर्मळे, सम्यक सर, सिमरन थूल, सम्यका गोडघाटे आणि श्वेता बोरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून आपल्या शैक्षणिक आणि करिअरविषयक शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक ठरला.











डॉ. विद्या चौरपगार
राज्यशास्त्र विभाग प्रमुख